अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई–३०
दुरध्वनी क्र.– ०२२–२४९२१२१२, २४९२२६१८
Email - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :– १७/०५/२०२४

**–: प्रेसनोट :–**

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | बृहन्मुंबई विभाग. |
| गुन्हा नोंद क्रमांक | १६/२०२४. |
| कलम | कलम ७ भ.प्र.अधिनियम १९८८. |
| आरोपी लोकसेवक | श्री मुयश शरद कांबळे, वय ३४ वर्षे, धंदा :- पोलीस शिपाई क्र. २०००६१, सशस्त्र पोलीस दल मरोळ, ल.वि.४, मरोळ, मुंबई |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ८ ते १० हजार रू. |
| स्विकारलेली रक्कम | रू. १८००/- |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार हे सशस्त्र पोलीस दल मरोळ, ल.वि. ४, मुंबई येथील 'एच' कंपनीत पोलीस हवालदार म्हणून कार्यरत असून कुर्ला कोर्ट येथे कर्तव्य करीत होते. दिनांक ०१/०५/२०२४ रोजी 'एच' कंपनीचे मदतनीस लोकसेवक श्री. मुयश शरद कांबळे, पोलीस शिपाई यांनी तक्रारदार यांना मोबाईलवर संपर्क करून मागितले की, तुम्हाला इतरत्र कर्तव्य देतो. तक्रारदार यांनी कुर्ला कोर्ट येथेच कर्तव्य देण्याची विनंती केली. त्यावरून लोकसेवक यांनी तक्रारदार यांना कर्तव्यावर गैरहजर राहण्यासाठी महिन्याला ८ ते १० हजार रू. दयावे लागतील असे मागून लाचेची मागणी केली. तक्रारदार यांना लोकसेवकास लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी दिनाक ०९/०५/२०२४ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे समक्ष हजर राहुन लोकसेवकाविरूध्द लेखी तक्रार केली.<br><br>फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून दिनांक १२/०५/२०२४ रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक यांनी फिर्यादी यांचेकडे गैरहजर राहणेकामी प्रतिदिनी रू. ४००/- दयावे लागतील असे मागून तडजोडीअंती प्रतिदिनी रू. ३००/- प्रमाणे लाचेची मागणी केली.<br><br>दिनांक १६/०५/२०२४ रोजी पंचासमक्ष केलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांना तक्रारदार यांच्याकडून रू. ३००/- प्रमाणे एकूण ०६ दिवसाचे रू. १,८००/- लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले, म्हणुन आलोसे श्री. मुयश शरद कांबळे, पो.शि.क्र. २०००६१ यांचेविरूध्द कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

मार्गदर्शन अधिकारी :- श्री. विजय पाटील, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( नितीन दळवी )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.

**टोलफ्री** क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८

**वेबसाईट** :– acbmaharashtra.gov.in, **ईमेल** :– acbwebmail@mahapolice.gov.in
**ईमेल** :– addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
**फेसबुक** :– www.facebook.com - Maharashtra ACB
**मोबाईल ॲप** :– www.acbmaharashtra.net